**सोलापूर महानगरपालिका**
**सभेचा इतिवृत्तांत**
**(मा.परिवहन समिती संदर्भ)**
**उप-समिती बैठक क्रमांक -४०**

महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.१९.०८.२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजता मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.

सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्री.श्रीराम पवार | सहा.आयुक्त |

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील बसेस व इतर वाहनांच्या दुरुस्तीकरीता सुटेभाग टायर्स, रिमोल्ड टायर्स यांत्रिक कामे केली जातात. प्रतीवर्षीप्रमाणे सन २०२२-२३ सालाकरीता दि.१८/०४/२०२२ रोजी प्रथम ई निविदा प्रसिध्द करणेत आलेली आहे. याकरीता दि.१०/०५/२०२२ रोजी अखेर तृतीय मुदतवाढ देणेत आलेली होती मुदतीअंती एक निविदा नविन टायर्स खरेदी व एक निविदा टायर्स रिमोल्ड करणेकरीता निविदा प्राप्त झालेली आहे. मक्ता निश्चितीचे काम हाती आहे. दरम्यान सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम हे अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्याने सातत्याने बसेस मार्गावर देणे आवश्यक आहे.<br>सन २०२२-२३ करीता २५ बसेस दुरुस्ती व इतर ३ वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीकरीता रक्कम रु.५०,००,०००/- इतका अंदाजे खर्च सुटेभाग टायर्स, रिमोल्ड टायर्स यांत्रिक कामे व इतर अनुषंगिक कामाकरीता अपेक्षित आहे. मक्ता निश्चितीचे कामास विलंब लागणार असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरणी ५ (२) (२) अन्वये जाहिरप्रसिध्दीकरणाची अट शिथिल होणेकरीता | परिवहन व्यवस्थापक | **प्रकरणाचे अवलोकन केले. रिटेंडर करणेस मान्यता देण्यात येत आहे व मक्तेदारानी साहित्य पुरवठा केल्यानंतर एक महिन्यात संबंधित मक्तेदाराचे बिल अदा करण्यात यावे अन्यथा व्याजासह पेमेंट करण्यात येईल अशी अट रिटेंडर मध्ये घालण्यात यावी.** |

पान ९१२
३.११.२० ९०१७२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मा.परिवहन समितीकडे मंजुरीस्तव पाठविणे आवश्यक आहे . परंतू सध्या मा.परिवहन समिती व अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मा.प्रशासक यांच्याकडे **मंजूरीस्तव** पाठविणे कामी मा.उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दि.२७/०६/२०२२ यांचे मान्यतेने आलेले प्रकरण **(ई-७१२७५) TM** | | |
| २ | ४ | कोंतम चौक येथील परिवहन उपक्रमाच्या मालकीची नियंत्रण कक्षाची १० फुट x १० फुट चे खोके भाडेतत्वावर देणेबाबत परिवहन विभागाकडून प्रस्ताव आलेला आहे. सध्या त्या जागेचे भाडे प्रति महिना र.रु.४०००/- प्रमाणे होत आहे. तसेच दि.१३ सप्टेंबर २०१९ च्या अधिसुचनेप्रमाणे रेडी रेकनर प्रमाणे र.रु.७३१ प्रतिमहिना असे भाडे येत आहे. सदर तुलनात्मक तक्त्यामध्ये पूर्वीच्या भाड्यापेक्षा रेडिरेकनर प्रमाणे काढण्यात आलेले भाडे कमीने येत आहे तरी पूर्वीच्या भाड्यामध्ये वाढ करून देणेत यावे तसेच ज्यावेळी सदरचे खोके रस्त्याच्या अथवा रहदारीस अडथळा येईल त्यावेळी काढून घावे लागेल या अटीस अधीन राहून ११ महिने कालावधी करीता भाडे तत्वावर देणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव मा.परिवहन समितीकडे पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.परिवहन समिती अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचे **मान्येस्तव** पाठविणे कामी मा.उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दि.१२/०८/२०२२ ने आलेले प्रकरण. **(ई-४५५२६) TM** | परिवहन व्यवस्थापक | **आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्ताव दप्तरी दाखल करयास मान्यता देण्यात येत आहे.** |

**मा.सहा.आयुक्त(परिवहन विभाग)**
**सोलापूर महानगरपालिका**

**नगर सचिव**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.मुख्यलेखापरिक्षक**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.अति.आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**

पान २/२
उ.क्र. ४० दि.१२।८।२२

३

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## (परिवहन समिती संदर्भ)
## विषय क्र.३ ठराव क्र.३ दिनांक.१९/०८/२०२२



सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील बसेस व इतर वाहनांच्या दुरुस्तीकरीता सुटेभाग टायर्स, रिमोल्ड टायर्स यांत्रिक कामे केली जातात. प्रतीवर्षीप्रमाणे सन २०२२-२३ सालाकरीता दि.१८/०४/२०२२ रोजी प्रथम ई निविदा प्रसिध्द करणेत आलेली आहे. याकरीता दि.१०/०५/२०२२ रोजी अखेर तृतीय मुदतवाढ देणेत आलेली होती मुदतीअंती एक निविदा नविन टायर्स खरेदी व एक निविदा टायर्स रिमोल्ड करणेकरीता निविदा प्राप्त झालेली आहे. मक्ता निश्चितीचे काम हाती आहे. दरम्यान सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम हे अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्याने सातत्याने बसेस मार्गावर देणे आवश्यक आहे.

सन २०२२-२३ करीता २५ बसेस दुरुस्ती व इतर ३ वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीकरीता रक्कम रु.५०,००,०००/- इतका अंदाजे खर्च सुटेभाग टायर्स, रिमोल्ड टायर्स यांत्रिक कामे व इतर अनुषंगिक कामाकरीता अपेक्षित आहे. मक्ता निश्चितीचे कामास विलंब लागणार असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरणी ५ (२) (२) अन्वये जाहिरप्रसिध्दीकरणाची अट शिथिल होणेकरीता मा.परिवहन समितीकडे मंजुरीस्तव पाठविणे आवश्यक आहे . परंतू सध्या मा.परिवहन समिती व अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मा.प्रशासक यांच्याकडे **मंजूरीस्तव** पाठविणे कामी मा.उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दि.२७/०६/२०२२ यांचे मान्यतेने आलेले **प्रकरणाचे अवलोकन केले रिटेंडर करणेस मान्यता देण्यात येत आहे व मक्तेदारांनी साहित्य पुरवठा केल्यानंतर एक महिन्यात संबंधित मक्तेदाराचे बिल अदा करण्यात यावे अन्यथा व्याजासह पेमेंट करण्यात येईल अशी अट रिटेंडर मध्ये घालण्यात यावी.**

(प्रविण प्रं.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूरमहानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## (परिवहन समिती संदर्भ)
## विषय क्र.४ ठराव क्र.४ दिनांक.१९/०८/२०२२



कोंतम चौक येथील परिवहन उपक्रमाच्या मालकीची नियंत्रण कक्षाची १० फुट x १० फुट चे खोके भाडेतत्वावर देणेबाबत परिवहन विभागाकडून प्रस्ताव आलेला आहे. सध्या त्या जागेचे भाडे प्रति महिना र.रु.४०००/- प्रमाणे होत आहे. तसेच दि.१३ सप्टेंबर २०१९ च्या अधिसुचनेप्रमाणे रेडी रेकनर प्रमाणे र.रु.७३१ प्रतिमहिना असे भाडे येत आहे. सदर तुलनात्मक तक्त्यामध्ये पूर्वीच्या भाड्यापेक्षा रेडिरेकनर प्रमाणे काढण्यात आलेले भाडे कमीने येत आहे तरी पूर्वीच्या भाड्यामध्ये वाढ करून देणेत यावे तसेच ज्यावेळी सदरचे खोके रस्त्याच्या अथवा रहदारीस अडथळा येईल त्यावेळी काढून घावे लागेल या अटीस अधीन राहून ११ महिने कालावधी करीता भाडे तत्वावर देणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव मा.परिवहन समितीकडे पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.परिवहन समिती अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचे <u>**मान्येस्तव**</u> पाठविणे कामी मा.उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दि.१२/०८/२०२२ ने आलेले **प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

I/c P.P.

**(प्रविण प्रे.दंतकाळे)**
**नगरसचिव**
**सोलापूरमहानगरपालिका**

सोलापूर महानगरपालिका मा. प्रशासक कार्यालय

**(पि.शिवशंकर, भा.प्र.से)**
**प्रशासक**
**सोलापूर महानगरपालिका**